ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Resarch Journal

Volume : II Issue : II July to Sept.- 2018



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Sarkate Sadashiv Haribhau**
Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका (Index)


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | VIOLENCE AGAINST WOMEN & GIRLS | Dr. Mohamad Mustafa A. Mujawar Nadwi | 1 |
| 2 | INDIAN IMAGES IN NISSIM EZEKIEL'S POETRY | Dr.Subhash S. Waghmare | 5 |
| 3 | Dr. Babasaheb Ambedkar Important Suggestion for Reservation for Sheduled Castes and Adivasi Tribes | Prakash Kharat | 8 |
| 4 | MODES OF IRRIGATION IN BEED DISTRICT, A GEOGRAPHICAL STUDY | Mr. Usare Bharat Rupchand, | 11 |
| 5 | Experiment in Engaging men in Gender Equality | Dr. Arundhati Suryakant Patil | 15 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली लोकशाही | प्रा. अरुण पडघन | 18 |
| 7 | मानव संसाधन विकास : सैध्दांतिक विवेचन | फुलारी ज्योती | 22 |
| 8 | बाबासाहेबांचे वाचन : एक वेध | डॉ. लक्ष्मण गीते | 27 |
| 9 | मराठी ग्रामीण कथेतील सहकाराचे चित्रण | प्रा. डॉ. बबन गायकवाड | 30 |
| 10 | दलित साहित्य : एक चिंतन | प्रा.लक्ष्मण गीते | 35 |
| 11 | आपत्ती व्यवस्थापन : आधुनिक काळाची गरज | प्रा. एकनाथ ज्ञानदेव खरात | 37 |
| 12 | म्हामानव नेल्सन मंडेला यांचे काव्यरूपाने दिसून येणारे चित्रण | डॉ. दादाराव गुंडरे | 42 |
| 13 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही | प्रा.डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव | 46 |
| 14 | ओतारी समाजाचे लोकजीवन | ओतारी विक्रम अभिमन्यू | 48 |
| 15 | बदलत्या हमावानाःचा भारतीय कृषीक्षेत्रावर परिणाम | प्रा.डॉ. देशमुख एस.बी. | 50 |
| 16 | नव्वदोत्तर स्त्रीवादी काव्य | प्रा. रेखा व्ही. इंगोल | 53 |
| 17 | 'आदिवासींच्या विकास योजना व दिशा " (20 वे शतक) नाशिक | श्री. जी. डी. रुपवते | 58 |
| 18 | माळव्यातील धार व देवास संस्थानाची प्रशासकीय व्यवस्था | प्रा.डॉ.सुनिल रजपूत | 60 |
| 19 | चारमीनार एक सुंदर आणि आकर्षक इमारत | प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | 64 |
| 20 | आदिवासी लेखकांनी लिहिलेले साहित्य : स्वरुप व विचार | प्रा. डॉ. जगतवाड शिवाजी पिराजी | 66 |
| 21 | अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी लेखन : आशय आणि वेगळेपण-काही निरीक्षणे | प्रा. डॉ. सोपान माणिकराव सुरवस | 69 |
| 22 | लीळाचरित्र : एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती | डॉ. सौ. जयदेवी पवार | 75 |


Scanned by CamScanner

# चारमीनार एक सुंदर आणि आकर्षक इमारत

**प्रा. डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन**
(इतिहास विभाग प्रमुख)
मिल्लीया महाविद्यालय, बीड.

चारमीनार कुतूबशाही, आसेफशाही सत्तेचा काळाचा प्रत्यक्ष साक्षी आहे. एवढेच नसून तर त्या काळातील संस्कृती, राहनीमान, कलेचा प्रतीक आहे. कुतूबशाही घराण्यातील राज्यकर्ते ज्ञान, साहित्य, ईतर ज्ञानाच्या शाखा व बांधकाम कलेचा सम्मान करणारे व आश्रय दाते होते. च्सूलतान मोहम्मद कुतूबशाहचा काळ बांधकाम ज्ञान, साहित्य व इतर कलेच्या क्षेत्रातील सुवर्णकाळ होता.छ' तो स्वत: कवी होता. साहित्य आणि संगीत कला प्रेमी होता. बांधकाम कलेत त्याला फार रूची होती. यामूळेच सुलतान मोहम्मद कूली कूतूबशहाच्या काळात ज्ञान व साहित्य बांधकाम कलेच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती झाली. त्यांनी बांधलेले महाल, चारमीनार, चार कमान, बाग बगीचे, बाजार, विविध रस्ते हैदराबाद शहर त्याच्या बांधकाम विषयी आवडीचे साक्षी आहे. प्रसिध्द इतिहाकार डॉ. सय्यद मोहियोद्दीन व ईतर इतिहास कारांच्या मते कुतूबशाही राज्याची राजधानी गोवळकोंडाच्या आजू बाजूस लोकांना वसवीने शक्य नव्हते. कुतूबशहाच्या अधिकाऱ्यांनी गोवळकोंडाच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये बाग बगीचे लावण्यास सुरूवात केली होती. गोवळकोंडा परिसरातील वस्तीचा विस्तार मूसा नदीकडे होण्यास सुरूवात झाली होती. यामूळे सूलतान मोहम्मद कुतूबशहा यांनी एक नवीन शहर वसविण्याचा निर्णय घेतला होता. प्रसिध्द इतिहासकार हारून खॉन शेरवानी म्हणतात की सूलतान मोहम्मद कुतूबशहाला शिकारीचा छंद होता. एकवेळ तो मूसा नदीवरील पूलाच्या पलीकडे शिकारीला गेला. त्या परिसरात भाग्यमतीचा गाव होता. आजूबाजूला घनदाट अरण्य होती. ही जागा त्याला नवीन शहर बसविण्यासाठी फार पसंत पडली. नंतर सूलतान कूतुबशहाने वास्तूतज्ञांना आदेश दिला की, एक नवीन शहर वसविण्याचा नकाशा तयार करावा ज्याचे उदाहरण जगात नसेल. 1590 ला नवीन शहर वसविण्यात आले. त्या शहराला सुलतान खुतुबशाहने आपली प्रेमीका भाग्यमतीचे नाव दिले.

काही इतिहासकारांच्या मते चचलम गावात भाग्यमती राहत होती तीच्या प्रेमात सूलतान मोहम्मद कुतूबशहा याने चचलम व आजूबाजूच्या पसिरात एक नवीन शहर बसवीले व त्या शहराला भाग्यनगर असे नाव दिले. जेंव्हा भाग्यमतीला हैदर महेल नावाचा किताब देण्यात आला त्यानंतर शहराचे नाव बदलून हैदराबाद करण्यात आले. सय्यद असगर अली बलगरामी यांनी Land Marks of the Deccan या आपल्या पुस्तकात हैदराबाद शहराच्या बांधकामाचा उल्लेख केला आहे. सूलतान मोहम्मद कूली कुतूबशहा यांनी हैदराबाद शहराच्या मध्यभागी वैभवशाली चारमीनार 1591 ते 1592 मध्ये बांधला. इतिहासकार लिहितात की चारमीनार मस्जिद आणि ताज़ीया सारखा आहे. ही भव्य इमारत आकाराने चौकोन आणि मेहराब ने बनविलेली आहे. चार ही दिशांनी चारमीनार सारखाच दिसतो. दोन मीनारमधला अंतर 60 फुट आहे. जमीनी पासून कमानीची लांबी 60 फुट आहे. दोन भींती मधील कमानींचा अंतर 36 फुट आहे. चार मीनार इमारतींच्या चारही दिशांनी मीनार आहे. प्रत्येक मीनारची लांबी जमीनी पासून 160 फुट आहे. चारमीनारच्या छता पासून मीनारची उंची 80 फुट आहे. मीनारच्या शेवट पर्यंत पोहचण्यासाठी 160 पायऱ्या आहेत.

पुरातत्त्वज्ञ डॉ. यज़दानी म्हणतात की छत आणि चार मीनारच्या दरम्यानचे मेहराबची उँची कमी करून चारमीनार वर नक्काशी करून आकर्षक व मनमोहक बनवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.छ² दूर वरून पाहतांना खालच्या मेहराबांची लाईन जी नऊ फुट उँच आहे ती सुंदर एक झालर प्रमाणे दिसते. फ्रान्सचा पर्यटक जो भारतात पर्यटनासाठी आला होता. तो आपल्या प्रवास वर्णनात लिहीतो की चार मीनार सारखी सुंदर मन मोहक इमारत हैदराबाद मध्ये दूसरी कोणतीही नाही. चारमीनारच्या छतावर पश्चिम दिशेला मस्जिद आहे जी कुतूबशाहीच्या काळातील सर्व मस्जिदी मध्ये सुंदर व आकर्षक आहे. चार मीनार मस्जिद कुतूबशाही काळातील अती नवीन पध्दतीने बांधलेली वास्तू आहे. मस्जिद मध्ये नमाज अदा



Scanned by CamScanner

रण्यासाठी व्यवस्थीत जागा आहे. मस्जिदीच्या पूर्वेला सुंदर मोकळी जागा आहे. (सहन आहे.) ज्या ठिकाणी एक कमान हे. ज्याच्या दोन्ही बाजूला लहान लहान आकाराचे दोन मेहराब आहे. प्रसिध्द इतिहासकार डॉ. यज़दानी, फ्रेंच पर्यटक सोर्येनीओ, मनूची, ट्रेव्हेनीयरच्या मते चारमीनार आसपासच्या बांधलेल्या कमानी समोर व शाही महेलच्या एक मोठा व शद्वार किंवा दरवाजा म्हणून बांधलेला आहे. परंतु प्रोफेसर हारून खॉन यांना हे मत मान्य नाही.

मीर रौशन अली आपली पुस्तक, च्तूझ्रू-ए-कुतूब शाहीयाछ मध्ये लिहितात की आज ज्या ठिकाणी चारमीनार हे त्या ठिकाणी 19 ऑक्टोबर 1591 ला मोहरमचा ताज़ीया ठेवण्यात आला होता. त्याच ठिकाणी ताज़ीयाच्या आकृती णे चारमीनार बांधण्यात आला. परंतु याला कूठलाच पुरावा नाही. डॉ. ज़ौरच्या मते चारमीनार शहराच्या मध्यभागी धण्यात आला व त्याच्या चार ही दिशांनी मोठ्या सडका व बाजारसाठीच्या इमारती बांधण्यात आल्या. च्एका कथे किंवा रे प्रमाणे हैदराबाद शहरामध्ये प्लेग ची साथ संपूर्ण शहरामध्ये पसरली होती. या मध्ये हजारो माणसे मृत्यु मुखी पडली ी. शेवटी शहरातील लोकांनी ताजीया, घेऊन शहरात मिरवणुक काढली नंतर प्लेगची साथ संपली. या आनंदात सुलतान म्मद कूली कुतूबशहा याने ताबूत किंवा ताज़ीया सारखी भव्य ईमारत बांधली त्याला चारमीनार असे म्हणतात.छ[3] ंच्या मते 1000 हिजरी सनाला सुरूवात झाल्यामुळे सुलतान मोहम्मद कुली कुतूब शहा याने चारमीनार बांधला. क्यात ही ईमारत बांधण्याचा उद्देश काहीही असो परंतु ही ईमारत बांधकाम कलेच्या दृष्टीने दर्जेदार आणि उत्तम आहे.

ओवेस फिरदोस खान आपली पुस्तक Mohd Quli Qutub Shah 4th King founder of Charminar लिहितात. च्The Most Imposing Muslim Building in South India It is a gateway with four ches facing the four principal roads of the town. Built in 1591 by Mohammed Quli tub Shah. The founder of Hyderabad at a cost of Rs. 7 (Seven) Lakhs.छ[4]

सार्वजनिक उत्सव असतांना चारमीनार वर रोशनाई केली जाते. त्यानेही तो फारच आकर्षक व सुंदर दिसतो ाज़ टेलर आपली पुस्तक The Noble Queen मध्ये लिहितात. चारमीनार प्रकाशामध्ये चाँदी सारखा चमकतो ण जर चारमीनारच्या प्रकाशामध्ये पाहिले की कुतूबशाही कालखंडाच्या वैभवाची आठवण आपल्याला होते. इतिहासाच्या ात आलेल्या वर्णनानुसार चारमीनार बांधण्यासाठी नऊ लाख रूपये खर्च आला होता. बहादुरदल खाँनच्या सुभेदारीच्या ात चार मीनारचा दक्षिण पश्चिमी भाग पडला होता. हा भाग बांधण्यासाठी साठ हजार रूपये खर्च आला होता. 1824 नासेरूद - दौलाच्या काळात चारमीनारला चूऩ्याची पालीश करण्यात आली होती. त्यावर एक लाख रूपये खर्च आला. 9 मध्ये चार मीनारच्या चारही बाजूला मोठी घड्याळे लावण्यात आली. काळ बदलला राजघराणी बदलली परंतू चार र आजही अत्यंत वैभवाने हैदराबाद शहरामध्ये आपली कला दाखवत उभा आहे.

र्भ :

Writer : - Owais Firdos Khan:- Mohd Quli Qutub Shah 4th King Founder of Charminar P.
3 Publication by Owais Firdos Khan Hyderabad.
Writer:- Mirza Mohammed Khizer :- Tarikh Ke Zaroke se. Page No. 41. Published by Akhtarkada ayat Bagh Aurangabad.
Writer:- Mirza Mohammed Khizer :- Tarikh Ke Zaroke se. Page No. 41. Published by Akhtarkada ayat Bagh Aurangabad.
Writer : - Owais Firdos Khan:- Mohd Quli Qutub Shah 4th King Founder of Charminar P. No. 4
ication by Owais Firdos Khan Hyderabad.
n Encyclopedia of Indian Archaeology ed. A ghosh (Vols, I and II) Munshiram Manoharlal, Delhi.)
riter: Mir Raoshan Ali:- Tuzuk-E- Kutubshahiya.
riter: Haroon Khan Sherwani :- Dakan Ke Bahmani Salatin.



Scanned by CamScanner

THIS QUARTERLY " POWER OF KNOWLEDGE " IS PRINTED BY,
PUBLISHED BY & OWNED BY SAW. SARKATE LATA SADASHIV &
PRINTED AT SHRADHA ENTERPRIZES, OPP. TAHSIL OFFICE,
NAGAR ROAD,BEED. TQ. & DIST. BEED - 431 122 (M.S.) &
PUBLISHED AT GEORAI, DIST. BEED 431 143 (M. S.)
EDITOR : SARKATE SADASHIV HARIBHAU.

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

Scanned by CamScanner